# 'विश्वकर्मा'मध्ये संगीत अभ्यासक्रम

कात्रज : 'दुःखाचा समूळ नाश करून, सुखद अनुभव संगीतातून मिळतो. कोणत्याही प्रकारचे संगीत शांत चित्ताने ऐकणे गरजेचे आहे. भारतीय संगीताबरोबरच विदेशी संगीताचा अभ्यास व्हायला पाहिजे,' असे मत जेष्ठ व्हायोलिनवादक डॉ. एल. सुब्रह्मण्यम् यांनी नुकतेच व्यक्त केले. आपल्या पुणे शहराला संगीताचा चांगला वारसा लाभला आहे. या संगीतातून जग जोडण्याबरोबरच मनेही जुळवता आली पाहिजे, असेही डॉ. सुब्रह्मण्यम् यांनी सांगितले.

कोंढवा येथील विश्वकर्मा युनिव्हर्सिटीमध्ये तीन वर्षीय म्युझिक अभ्यासक्रमाच्या शुभारंभप्रसंगी डॉ. सुब्रह्मण्यम् बोलत होते. कार्यक्रमाला ज्येष्ठ गायिका कविता कृष्णमूर्ती, युनिव्हर्सिटीचे अध्यक्ष भरत अग्रवाल, उपाध्यक्ष तृप्ती अग्रवाल, कुलगुरू डॉ. सिद्धार्थ जबडे, प्रा. वासुदेव गाडे आदी उपस्थित होते. येत्या डिसेंबरमध्ये युनिव्हर्सिटीमध्ये मोठ्या संगीत महोत्सवाचे आयोजन करणार असल्याचे अग्रवाल यांनी सांगितले. अभ्यासक्रमाच्या उद्घाटनप्रसंगी ज्येष्ठ गायक पं. उल्हास कशाळकर, ज्येष्ठ व्हायोलिनवादक पं. अतुलकुमार उपाध्ये उपस्थित होते.

## अभ्यासक्रमात काय ?

- अभ्यासक्रमात हिंदुस्थानी आणि पाश्चात्य शास्त्रीय संगीताचे धडे दिले जातील. ७० टक्के भर प्रात्यक्षिकांवर असेल.
- संगीत सादरकर्ते आणि संगीत क्षेत्र व्यावसायिक म्हणून घडण्याची प्रक्रिया या अभ्यासक्रमाद्वारे होऊ शकेल.
- या अभ्यासक्रमांतर्गत विद्यार्थ्यांना लक्ष्मीनारायण जागतिक संगीत महोत्सव या वार्षिक महोत्सवात सहभागी होण्याची संधी मिळेल. त्यांना जागतिक दर्जाचे संगीत ऐकायला मिळेल.
- बीए संगीत हा विभाग लक्ष्मी नारायण ग्लोबल सेंटरच्या सहकार्याने सुरू केला आहे. याअंतर्गत विविध प्रकारचे संगीत शिकवले जाणार आहे.